**रोल्स रॉइस मोटर कार्स**

प्रसारमाध्यमांसाठी माहिती

# रोल्स रॉइस डॉन- अद्भुत उत्तम ऐषाराम

८ सप्टेंबर २०१५, गुडवूड

''आमच्या नवीन रोल्स रॉइस डॉनमधून एक अद्भुत, आकर्षक वाहनाचा अनुभव मिळतो जो आतापर्यंत इतर कोणत्याही रोल्स रॉइसमध्ये मिळालेला नाही आणि त्यातून एक ओपन टॉप, अत्यंत ऐषोरामी मोटरिंगचे एक नवीन युग उगवले आहे. डॉन ही एक नवीम सुंदर मोटर कार आहे ज्यातून जगातील सर्वाधिक उत्तम ओपन टॉप मोटरिंगचा अनुभव मिळतो. ही सर्वाधिक ऐषारामी ड्रॉपहेड कार्सपैकी एक आहे, जी अशा लोकांसाठी आहे ज्यांना जगातील सर्वांत खास सोशल हॉटस्पॉटवर सूर्यप्रकाशात न्हाऊन निघायला आवडते.

थोडक्यात सांगायचे तर, ही आतापर्यंतची सर्वांत देखणी रोल्स रॉइस आहे.

तिचे 'डॉन' हे नाव आपल्यासाठी दररोजची सकाळ आणत असलेल्या ताज्या संधींनुरूप आहे- एक उगवणे. आपल्या संवेदना खुल्या करणे आणि सूर्यप्रकाशाचे तेज उजळणे. आपल्या तात्पुरत्या, सुंदर आणि उगवत्या रूपात पहाट हे रात्रीच्या गर्द काळोख्या अंधारातून जगाला प्रकाशाकडे नेण्याचे प्रतीक आहे. पहाटेच्या थंड हवेमुळे त्वचेला गुदगुल्या होतात, संवेदना जागृत होतात आणि दिवस सुरू होतो तसे उत्साह निर्माण होतो.

एलेनॉर थॉर्नटनप्रमाणेच स्पिरिट ऑफ एक्स्टसीमागील अनेकांचे विचार प्रेरणादायी असू शकतात. रोल्स रॉइस डॉन मालकाला अशी भावना देते की, दिवस आत्ताच सुरू झाला आहे आणि दिवसभरात काहीही करता येणे शक्य आहे.''

**थोर्स्टन म्युलर ओएटव्होइस, मुख्य कार्यकारी अधिकारी, रोल्स रॉइस मोटर कार्स**

**प्रास्ताविक**

**''जवळपास सारे बरोबर किंवा चांगलेच असे काहीही स्वीकारू नका.''**

रोल्स रॉइसच्या ऐषारामात तडजोड या शब्दाला जागा नाही. खऱ्या अर्थाने ही कंपनी सहसंस्थापक हेन्री रॉइस यांच्या ''तुम्ही जे काही करता त्यात अचूकता आणण्यासाठी प्रयत्नशील राहा. अस्तित्त्वात असलेले सर्वोत्तम घ्या आणि त्याला आणखी चांगले बनवा. ते अस्तित्त्वात नसते तेव्हा त्याची रचना करा. जवळपास सारे बरोबर किंवा चांगलेच असे स्वीकारू नका,'' या तत्वांना जागते.

या तत्त्वाचा पहिला भाग म्हणजे - ''तुम्ही जे काही करता त्यात अचूकता आणण्याचा प्रयत्न'' - यातून कंपनीच्या प्रत्येक कामाबाबत, विशेषत: नवीन मोटरकारच्या निर्मितीबाबत माहिती मिळते. दुसरे- ''अस्तित्त्वात असलेले सर्वोत्तम घ्या आणि त्याला आणखी चांगले बनवा'' - फँटम सीरिज २ आणि घोस्ट सीरिज २च्या यशांमध्ये हे स्पष्टपणे दिसले आहे, कारण त्यांच्यात २०१२ आणि २०१४ मध्ये अनुक्रमे मोठ्या प्रमाणावर सुधारणा

करण्यात आली होती. रोल्स रॉइसने या ऑथेंटिक जेंटलमेनच्या ग्रॅन टुरिस्मोला जगाच्या रंगमंचावर परत येण्याची वेळ आल्याचे रोल्स रॉइसला कळले तेव्हा त्याबाबत सर हेन्री यांच्या विधानाच्या तिसऱ्या भागाचा आधार घेण्यात आला- ''जेव्हा तसे काही नसेल, तेव्हा त्याचे डिझाइन करा.'' आणि त्यामुळे व्रेथचा जन्म झाला.

आता या विधानाच्या अंतिम भागाने रोल्स रॉइसच्या डिझाइन आणि अभियांत्रिकी टीम्सना मार्गदर्शन मिळाले आहे. कारण त्यांनी ओपन टॉप, सुपर लक्झरी मोटरिंगमध्ये नवीन युग आणण्यावर काम केले आहे. सर्वाधिक मोठ्या ऑटोमोटिव्ह तडजोडी असलेल्या या खास क्षेत्रात जिथे २-२ सीटची रचना असते, तिथे रोल्स रॉइसने ''जवळपास बरोबर किंवा चांगले स्वीकारू नका'' या तत्वाचा अंगीकार केला आहे.

आणि त्याचमुळे नवीन रोल्स रॉइस डॉन जगातील एकमेव खऱ्या आधुनिक चार सीटर सुपर लक्झरी ड्रॉपहेडचा जन्म झाला आहे.

**''पहाट होण्यापूर्वी नेहमीच सर्वाधिक काळोख असतो''**

अत्यंत आव्हानात्मक कालावधीमध्ये ''पहाट होण्यापूर्वी नेहमीच सर्वाधिक काळोख असतो'' ही व्याख्या इंग्लिश रिस्टोरेशन प्रचारक थॉमस फुलर यांनी तयार केली असून ती आशेचा एक किरण म्हणून मानली जाते. पहाटेच्या काळोखात जिथे फँटम, भुते, राक्षस अशा गोष्टींचा विचार केला जातो आणि जिथे आपल्या मनातील काळोख उगवत्या सूर्यप्रकाशामुळे उजळून निघतो व भीती नाहीशी होते, आणि आपण नवीन पहाट झाल्यामुळे जागे होतो आणि नवीन दिवसाच्या असंख्य संधी आपल्यासमोर उभ्या राहतात.

१९५२ साली हीच भावना होती, कारण जग एका मोठ्या युद्धानंतर आर्थिक मंदीच्या परिस्थितीतून वर येऊ लागले होते. त्यावर्षी जग आशेने पुढे पाहत होते कारण जगातील पहिली पॅसेंजर जेट असलेल्या ब्रिटिश डेहॅविलंड, कॉमेटने आपले पहिले कमर्शियल उड्डाण केले, विश्वाच्या निर्मितीची बिग बँग थिअरी सर्वप्रथम पुढे आणि राणी एलिझाबेथ दुसरी ब्रिटनच्या सिंहासनावर आरूढ झाली.

त्याचवर्षी प्रत्यक्ष रोल्स रॉइस सिल्व्हर डॉन ड्रॉपहेड जी नवीन रोल्स रॉइस डॉनच्या डिझायनर्ससाठी आकर्षणाचा बिंदू ठरली, त्याची रचना रोल्स रॉइस कोच बिल्डरच्या पॉर्क वॉर्ड यांच्याकडून पूर्ण केली केली आणि ती कॅनडातील कर्नल डब्ल्यू. ए. फिलिप्स या पहिल्या ग्राहकाकडे सुपूर्द करण्यात आली.

त्याच वेळी रोल्स रॉइससाठी ही एक नवीन सुरूवात होती. मूळ सिल्व्हर डॉन ही पहिली रोल्स रॉइस होती, जी फॅक्टरीमध्ये बनवलेल्या बॉडीसह देण्यात आली होती. तथापि, सिल्व्हर हेड या नावाने चालवल्या जाणाऱ्या ड्रॉपहेड रोल्स रॉइसची बांधणी वैयक्तिक ग्राहकांसाठी कोचमध्ये बांधण्यास सुरूवात झाली होती आणि त्यातून त्यांचे खास रूप व दुर्मिळता टिकवली गेली आणि एका अशा युगाचा आशावाद आणला गेला, ज्यातून आपण आयुष्याचा आनंद पुन्हा घेण्यास सुरूवात करून ला डोल्स व्हिटाचा पाठपुरावा सुरू केला.

१९५० ते १९५४ दरम्यान २८ अत्यंत खास ड्रॉपहेड बॉडीजना हे प्रसिद्ध आणि दुर्मिळ रोल्स रॉइसचे नाव देण्यात आले होते.

Rolls-Royce Motor Cars

The Drive, Westhampnett, Chichester, West Sussex PO18 0SH
Telephone +44 (0)1243 384000
www.press.rolls-roycemotorcars.com

रोल्स रॉइसच्या नवीन डॉनने सिल्व्हर डॉनकडून प्रेरणा घेतली असून ते ऐषारामी मोटरिंगमधील जगातील पहिली गाडी देत आहेत- जी २०१५ मधील एक ऐषारामी आणि चार सीटची कन्व्हर्टिबल मोटर कार काय असू शकेल याचे प्रतिबिंब असेल- दुर्मिळ, सुधारित व सर्वाधिक सामाजिक सुपर लक्झरी कार ही आहे.

१९५२च्या सिल्व्हर डॉन ड्रॉपहेडप्रमाणेच नवीन रोल्स रॉइस डॉन त्यांच्या इतर समकालीन गाड्यांपेक्षा वेगळी आहे. त्यात सुमारे ८० टक्के खास बॉडी पॅनल्स आहेत.

खऱ्या अर्थाने अत्यंत ऐषारामी मोटरिंगसाठीची ही नवीन पहाट आपल्या वचनाची पूर्तता करेल, याची काळजी घेण्यासाठी बारीक लक्ष देण्यात आले आहे. अगदी रस्त्यांना नवीन रोल्स रॉइसला जोडणारे टायर्स आहेत, त्यांची रचना प्रत्येक रोल्स रॉइसमध्ये अपेक्षा असलेल्या 'जादूई कारपेट' प्रवासाचा अनुभव देण्यासाठी खास करण्यात आली आहे आणि त्यामुळे रोल्स रॉइसचे मूळ स्थान गुडवूड येथे राहिले आहे.

तसेच, डॉनचे छत बनवण्यासाठी खास अभियांत्रिकी आणि उत्पादनाकडे लक्ष देण्यात आले आहे. आतापर्यंत आधुनिक मोटर उद्योगात कधीही न ऐकलेले रोल्स रॉइस डॉनचे छत वर असताना अत्यंत शांतपणे काम करते आणि अगदी ताशी ५० किलोमीटर या वेगावरही अत्यंत शांतपणे अवघ्या २० सेकंदांमध्ये ते उघडले जाते.

त्यामुळे आपण सहजपणे म्हणू शकतो की, नवीन रोल्स रॉइस डॉन आतापर्यंतची सर्वांत शांत ओपन टॉप कार आहे.

**डिझाइन**

**२+२ $\neq$४**

''रोल्स रॉइसच्या जगात रोजचे गणितीय नियम लागू होत नाहीत. त्याचमुळे नवीन रोल्स रॉइस डॉनबाबत मी असे म्हणेन की, दोन अधिक दोन म्हणजे चार होत नाहीत.''

**गिल्स टेलर, डिझाइन संचालक, रोल्स रॉइस मोटर कार्स.**

ओपन टॉप मोटर कार्स विभागाचा अभ्यास करत असताना आणि मुख्यत्त्वे त्यांचा उच्च किंमतीचा ऐषारामी विभाग पाहताना, रोल्स रॉइसच्या डिझायनर्सच्या एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे ग्राहकांना छोटे-छोटे बदल हवे असतात. त्यामुळे आतापर्यंत २ अधिक २ विभागावर लक्ष केंद्रित करणे ही रोल्स रॉइसच्या दृष्टीने आतापर्यंत एक तडजोड ठरली होती.

सामान्यत: २ अधिक २ ही रचना अशी आहे, ज्यात ड्रायव्हरसाठी जागा आणि एक प्रवासी पुढील बाजूस तर मागील बाजूस कधी-कधी प्रवास करणारे प्रवासी किंवा मुले यांच्यासाठी दोन छोट्या सीट्स होत्या. मागील बाजूस असलेली जागा लेग रूमच्या बाबतीत बघायला गेल्यास जवळपास नगण्य होती. त्यामुळे कारचा आरामदायीपणा आणि प्रात्यक्षिकता वापर कठीण होत होता. बदलणाऱ्या बॉडी टाइप्सच्या बाबतीत जागेतील ही घट मुख्यत्त्वे उत्पादकाची कन्व्हर्टिबल छत आणि बूट आणि मागील प्रवाशाची जागा यांचे पूर्ण पॅकेज देण्याची अक्षमता दर्शवत

होती. त्याचा परिणाम म्हणजे खास ओपन टॉप कार्ससाठी तयार केलेल्या विभागात ज्यात रोल्स रॉइस येते, तो तडजोड केलेला आणि 'वापरण्यास फारसा योग्य नाही' अशा प्रकारचा होता.

''रोल्स रॉइसमध्ये आम्हाला उत्तम दर्जाच्या मोटर कार्स ज्या सामाजिक स्थाने म्हणून काम करतात अशांचे निर्माते म्हणून ओळखले जाताना खूप अभिमान वाटतो,'' असे टेलर म्हणतात. ''डॉनसारखी कार निर्माण करण्याची कल्पना जिचा वापर रोजच्या रोज केवळ दोन मोठ्या व्यक्तींकडून आरामात केला जाईल, ही योग्य नव्हती. डॉन तयार करत असताना अत्यंत स्टाइलमध्ये प्रवास करू इच्छिणाऱ्या चार मोठ्या व्यक्तींचा आरामदायीपणा आणि ऐषाराम यांच्याबाबत कोणतीही तडजोड न करण्याचे ठरवले होते.''

**एक अद्भुत, खिळवून ठेवणारी गाडी**

''डॉन ही एक अशी रोल्स रॉइस आहे, जी प्रवासात असतानाही आपल्याला घरी असल्याची भावना देते. कोट ड अझूर याच्या आयुष्यातून या गाडीला प्रेरणा मिळाली आहे. ही गाडी कॅसिनो लाइफस्टाइलला अगदी साजेशी आहे. आपल्या भूमिकेत अत्यंत योग्य असलेल्या या गाडीचे उद्दिष्ट हे स्वातंत्र्य आणि वापरयोग्यता या दोन्ही गोष्टींसाठी लोकांना आकर्षित करण्याचे आहे,'' असे मत गिल्स टेलर, डिझाइन संचालक यांनी व्यक्त केले.

''रोल्स रॉइस मोटर कार्समध्ये आम्ही कोणत्याही तडजोडीशिवाय डिझाइन तयार करतो आणि या तडजोड न करण्याच्या दृष्टीकोनामुळे प्रत्येक नवीन कारसोबत नवीन आव्हाने उभी राहतात,'' असे टेलर म्हणतात. ''नवीन रोल्स रॉइस डॉनच्या बाबतीत आम्ही त्याची रचना रोडपासून करून एक अद्भुत, खिळवून ठेवणारी गाडी अशीच केली आहे.''

नवीन रोल्स रॉइस डॉन पाहणाऱ्याला एका अद्भुत व सुंदर बाह्य डिझाइनसोबत आकर्षित करते आणि त्यासोबत क्लासिक रोल्स रॉइस अनुभव आणि अस्तित्त्व आपल्याला दिसते. ती एक सर्वोत्तम रोल्स रॉइस आहे आणि त्याचवेळी त्यात अत्यंत आकर्षित करणारे व देखणे गुण आहेत जे सौंदर्य, अत्याधुनिकता आणि सुधारणा या ड्रॉपहेड वर्गात देतात. जी एक सुंदर आणि तरीही वेगळी भावना आहे, जी कोणत्याही तडजोडीविना चालवण्याचे स्वातंत्र्य देते.

त्यातून एक आरामदायीपणा व कोणत्याही मेहनतीशिवायचा सेन्सरी अनुभवाची नवीन पातळी मिळते आणि त्यात एक उत्तम रचना आणि सौंदर्य आहे. हे सर्वकाही आराम आणि जागा यांच्याबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड न करता साध्य करण्यात आले आहे. ही नवीन रोल्स रॉइस अत्यंत गतिकीय आणि सामाजिक दर्जांनी युक्त आहे ज्यातून जगभरातील मोठ्या, तरूण आणि सामाजिकदृष्टया जास्त जागरूक प्रेक्षकांना आकर्षित करू शकेल.

प्रसारमाध्यमांच्या अंदाजापलीकडे जाऊन नवीन रोल्स रॉइस डॉनमध्ये एक रेथ ड्रॉपहेड नाही. नवीन डॉनचे ८० टक्के बाहेरील बॉडी भाग हे नव्याने डिझाइन करून रोल्स रॉइसच्या डिझाइनच्या भाषेत बदल करण्यासाठी आणि अत्यंत समकालीन, चार सीट सुपर लक्झरी ड्रॉपहेड रचनेला चालना देण्यासाठी तयार करण्यात आले आहेत.

त्याचे उद्दिष्ट स्पष्ट होते. आतापर्यंत इतर कोणत्याही कार उत्पादकाने केलेले नाही असे काही करणे- अशी कार तयार करणे जी छत वर केल्यावरही तितकीच सुंदर दिसेल जितकी खाली केल्यावर दिसते. आपण हे सहजपणे

म्हणू शकतो की, डिझाइन टीमच्या अथक प्रयत्नांचा परिणाम म्हणजे नवीन रोल्स रॉइस डॉनच्या दोन कार एकात निर्माण करणे हे आहेत.

**बाह्य डिझाइन**

रोल्स रॉइस डॉन कालातीत रोल्स रॉइस डिझाइनच्या तत्त्वांचे पालन करते. २:१ चाकाची उंचीच्या तुलनेत गाडीची उंची, लांबलचक बॉनेट, शॉर्ट फ्रंट ओव्हरहँग, मागील मोठे ओव्हरहँग, एक सुंदर टॅपरिंग मागील ग्राफिक आणि उच्च शोल्डर लाइन यांचा त्यात समावेश आहे.

ही सर्व परंपरा एका अत्यंत सुंदर आणि अत्यंत समकालीन डिझाइनमध्ये दिली जाते.

एखाद्या ॲथलीटप्रमाणेच रोल्स रॉइस कायमच तयार, उभी आणि जायला सज्ज अशी दिसते. यातील वेगवान ॲक्सेलेरेशन व पृष्ठभागावरील ताण पूर्णपणे नवीन पॅनल्समधून वाढवल्या जातात आणि त्यातून एक असे वळण मिळते, जे मजबूत पृष्ठभाग आणि जास्त शक्तिशाली देखणी गाडी तयार होते.

डॉनची शक्तिशाली आणि अद्भुत फ्रंट बाजू त्याला एक सुंदर पण तरीही मजबूत व पुरूषी लुक देते आणि त्याच्या बोल्ड देखण्या शोल्डर लाइन्स मागील चाकांवरून पुढे जातात, तेव्हा त्या आणखी आकर्षक होतात आणि एक व्यापक ट्रॅक तयार करतात. बॉनेटवरील कोरीव 'वेक चॅनेल' जे स्पिरिट ऑफ एक्स्टसीच्या पंखांमधून तयार झालेले आहे ते एका जेटच्या व्हेपर ट्रेलच्या दृश्यातून बाहेर येतात आणि कारच्या गतिकतेला चालना देतात. त्याची उंच शोल्डर लाइन, मोठा सी पिलर आणि आडवी निमुळते साइड विंडो अपेर्टर साइड ऑन आणि रूफ अपमधून पाहिले जातात, तेव्हा ही कार 'हॉट रॉड'पेक्षा कमी देखणी दिसत नाही.

पुढील बाजूस असलेले ग्रिल सुमारे ४५ मिमी पर्यंत कमी केलेले आहे आणि खालील फ्रंट बंपर रेथच्या तुलनेत ५३ मिमीपर्यंत विस्तारित करण्यात आले आहे. हे सारेकाही जेट एअर इनटेक फेसवर लक्ष ठेवून करण्यात आले असून ही कार उभी असतानाही जास्त केंद्रीभूत करण्यासाठी करण्यात आले आहे. ग्रिल डिझाइन मागील शोल्डर्सच्या बाजूला कारचा ताण वाढवण्यास मदत करते आणि त्याचवेळी डॉनच्या अत्यंत देखणेपणाला अधोरेखित करते.

रोल्स रॉइस कुटुंबातील इतर कार्सच्या तुलनेत पारंपरिक उभ्या लाइन्सऐवजी कारच्या आडव्या लाइन्सवर ग्रिल आणि बंपर लक्ष देतात. या बंपरमध्ये आता नंबर प्लेस सराऊंड आणि नवीन लक्ष्याधारित लोअर एअर डॅम आहेत. खालील व्हेलन्सच्या बाजूला असलेले मेश कमी करुन काळ्या रंगात रंगवलेले आहे आणि त्यातून ग्रिलच्या खोलीला पूरक ठरेल, अशा रितीने खोलीची भावना त्याला देण्यात आली आहे. तसेच क्रोम 'ब्लेड्स' कारला प्लान्ट करण्यात मदत करतात आणि त्याचवेळी आडव्या लाइन्सना पूरक ठरुन कारभोवती डोळ्यांच्या प्रवाहाला वेग देतात. त्यामुळे ताकद व लांबी यांच्या भावना वाढवल्या जातात.

रोल्स रॉइस डॉन एका बाजूने पाहिली असता आपली नजर कारच्या सुंदर रचनेवर पडते. यातील मऊ टॉप शेप अत्यंत मिळता-जुळता आणि समरस होणारा असून तो कुरूप आत वळलेल्या बाजूचा किंवा टोकदार बाजूंचा नाही जे आपण इतर उत्पादनांच्या सॉफ्ट टॉप्समध्ये पाहू शकतो. याशिवाय, नवीन २१ इंची पॉलिश्ड आणि २१

इंची आणि २० इंची पेंटेड चाकांमुळे डॉन रोल्स रॉइसच्या आरामदायीपणाची अचूकपणे तयार केलेले समकालीन अभिव्यक्ती आपल्याला मिळते.

कारची मागील बाजू, जी डॉनच्या स्त्रीसारख्या दिसणाऱ्या कमरेवरून पुढे जाते आणि मागील बाजूस मोठी होते. रोल्स रॉइस ड्रॉपहेड कूप्सच्या सुरुवातीच्या 'बोट टेल्स'च्या देखण्या डिझाइन्ससारखी दिसते आणि खऱ्या अर्थाने ती त्यांना प्रेरणा देणाऱ्या विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या गाड्यांसारखीच दिसते.

सॉफ्ट टॉप कोणताही आवाज न करता खाली येत असल्यामुळे रोल्स रॉइस डॉनमध्ये मोठे बदल दिसतात, जे एका अस्सल डॉन क्षणांना वितरित करतात. मिडनाइट सफायर बाह्यरचना आणि मँडरिन लेदरची अंतर्रचना यांच्या तपशीलाद्वारे रात्र अगदी दिवसाप्रमाणेच होते कारण सूर्यप्रकाशाचे किरण पुढे दिसतात आणि तिचे आतील रूप बाहेर येते. ही खास जागा शक्यतांच्या व्यापक जागांसह भरली जाते.

छत खाली आणल्यावर रोल्स रॉइस डॉनचे देखणेपण आणखी खुलते. एका बाजूने पाहिले असता विंडस्क्रीनचा तीव्र उतार, मागील बाजूस येणारी लाइन आणि उच्च बेल्टलाइन जी प्रोफाइलसोबत वर जाते ती कोणत्याही प्रकारच्या प्रयत्नांशिवाय गाडी चालवणे शक्य करते. तीच वर जाणारी बेल्टलाइन मागील प्रवाशांच्या केबिनमध्येही जाते आणि ती जाकिटाच्या कॉलरप्रमाणे दिसते. त्यामुळे त्यांच्या मानेचेही संरक्षण करणे शक्य होते.

स्टेलनेस स्टीलचा वेस्ट लाइन फिनिशर केबिनभोवती गुंडाळला जातो आणि त्यात एक डेक आहे, ज्यातून उघडला गेल्यावर सॉफ्ट टॉप उलगडत जातो आणि उच्च पातळीच्या ब्रेकलाइनसोबत तो समरस होतो. हे धातूचे सुंदर वैशिष्टय स्टेनलेस स्टील दरवाजाच्या हँडल, पॉलिश केलेली चाके, दृश्य एक्झॉस्ट आणि मागील बंपर ज्वेलरीसोबत समरस होते. त्यामुळे गाडीला एक अमूल्य लूक आणि संवेदना मिळते.

या गाडीचा डेक हा एक उत्तम कारागिरीचा नमुना आहे. तो ओपन पोअर कॅनाडेल पॅनलिंगमध्ये तयार करण्यात आला असून त्यात मागील केबिनचा हॉर्स शू शेप आहे. त्यातून गुडवूडच्या रोल्स रॉइसच्या घरातील वूडशॉपमधील कारागिरांनी वूड क्राफ्टिंग तंत्रज्ञान आणि कौशल्य यांत मिळवलेल्या प्रावीण्याचा नमुना मिळतो.

आपल्या वैयक्तिक आवडीनिवडीनुसार ग्राहकांनी निवडलेले डेकवरील वूड मागील सीटच्या 'वॉटरफॉल'मधून खाली येते व केबिनभोवती फिरते आणि अंतर्गत दरवाजांचे पॅनल्स त्यात कव्हर करून मालकाला डॉनमध्ये प्रवेश करण्यास आकृष्ट करते.

**अंतर्गत डिझाइन**

रोल्स रॉइसचे खास कोच दरवाजे त्यांच्या स्वत:च्या रुपात पुन्हा एकदा ड्रॉपहेड प्रकारात आले आहेत. यातील कोच दरवाजे आकर्षक व सुंदर आहेत. या दरवाजासोबत लांब फ्रंट विंग्स आणि आरामदायी वाफ्ट लाइन असून त्यातून एक लांब बॉडी प्रोफाइल आणि कॉसेट केलेले केबिन तयार केले गेले आहेत.

क्लासिक स्पोर्ट कारसारखी दिसणाऱ्या या गाडीत डॉनच्या आलीशान सौंदर्यातून मागे बसणाऱ्या प्रवाशांना सहजपणे आत आणि बाहेर येता येते. मागील प्रवासी केवळ रोल्स रॉइस डॉनमधून बाहेर येत नाहीत तर ते उभे

राहतात आणि बाहेर पडतात जसे आपण एखाद्या रिव्हा मोटर लाँचमधून मोनॅको किंवा लेक कोमोमधील दिमाखदार खासगी जेट्टीमध्ये बाहेर पडलेलो आहोत.

आपल्याला एका रोल्स रॉइसमध्ये अपेक्षित असते त्याप्रमाणे कोचचे दरवाजे केवळ आतबाहेर करण्याचा मार्ग म्हणून काम न करता एक आणखी मुलभूत उद्दिष्ट पूर्ण करतात. अर्थातच तितकेच महत्त्वाचे म्हणजे ते बॉडीची एकूण ताकद व टिकाऊपणा यांच्यात भर घालतात, कारण ते कोणत्याही अडथळ्याविना ए-पिलरची बांधणी करू देतात.

डॉनमध्ये प्रवेश केल्यानंतर पहिली भावना लाकूड आणि लेदर यांच्या अत्यंत सुंदर आलीशान व देखण्या रुपात वसलेल्या चार वेगवेगळ्या बकेट सीट्स आहेत. चालकाच्या ए-पोस्टकडून कारच्या मागील बाजूस स्लिंगशॉट कल्पना जाते आणि ती मागील बाजूच्या सीटभोवती फिरते व ती पुन्हा ए पिलरच्या प्रवाशांकडे परत येते.

स्लिंगशॉट प्रकार बारचेटा, मागे ओढलेला, सुंदर आणि गाडीतील प्रवाशांना क्षितिजापर्यंत नेण्यासाठी अगदी गाडी थांबलेल्या स्थितीत असतानाही सज्ज असतो. हे डिझाइन कारच्या बाहेरील बाजूस असलेल्या एक्सेलेरेटेड टेन्शनला पूरक ठरते. यातील अंतर्रचना बाह्यरचनेला पूरक ठरते आणि जे ठिकाण सौंदर्य, सुरक्षितता व अस्तित्त्व दर्शवते.

रोल्स रॉइस डॉनमध्ये चार अत्यंत वैयक्तिक, कॉसेटिंग सीट्स आहेत. ही गाडी पूर्ण चार सीटर असून तुम्ही कुठेही बसलात तरी तुमच्याबाबत आरामदायीपणात तडजोड होत नाही. त्याच्या सीट्सची रचना ऊर्जात्मक आणि तरीही सुंदर घटक यांच्यावर आणि कारच्या उद्दिष्टाच्या भावनेवर अधोरेखित करण्यासाठी मदत करते, ज्याला एकमेकांना जोडणारे पूर्ण लांबीचे मधील कॉन्सोल पूरक ठरले आहेत. वरील सीटच्या मागील बाजूमध्ये सीटबेल्ट आहेत. ते पिलरलेस बॉडीवर्कसोबत एकत्र येऊन वूड किंवा लेदरच्या स्लिंगशॉटमध्ये भर घालते व अधोरेखित करते आणि त्यातील प्रवाहीपणात कोणतेही अडथळे नाहीत. ट्रेच्या पृष्ठभागावरील लाकूड सेंटर कॉन्सोलच्या केंद्राभोवती जुळवलेले असून ते ॲक्सिलरेटेड भावना देण्यासाठी शेवरॉन पॅटर्नमध्ये पुढे येते.

यातील साधनांच्या डायल्समध्येही खूप सुधारणा करण्यात आल्या असून त्यात वैयक्तिकदृष्टया लावलेल्या पॉलिश मेटल चॅपलेट्स डायल्सभोवती असतात जे हाताने बनवलेले, आलीशान मनगटी घड्याळाच्या अचूक डिझाइनसारखे असतात, आणि मॅट क्रोम सेंटर्स प्रत्येक साधनाच्या मध्यभागी तरंगतात. याशिवाय, नवीन क्लोक डिझाइन ज्यात नवीन मोटर कारचे नाव आहे तेही यात आणण्यात आले आहे.

**अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान**

**सायलेंट बॅले**

नवीन रोल्स रॉइस डॉनचे अभियांत्रिकी वैशिष्टय म्हणजे त्याचे नवीन छत आहे. रोल्स रॉइसच्या नावाला खरे ठरवताना डॉनने एक उत्तम ड्रायव्हिंग अनुभव आपल्या सर्व रोल्स रॉइससोबत दिला आहे. त्याचवेळी एका रोल्स रॉइससाठीची एकमेव निवड ही सौंदर्य, रोमान्स आणि ब्रँडची योग्यता यांच्या दृष्टीने छताचे कापड ही होती. पाऊस पडत असताना रात्रीच्या वेळी एखादी कन्व्हर्टिबल गाडी चालवणे आणि छतावर टपटपणाऱ्या पावसांचा आवाज

ऐकणे यांच्याइतके रोमँटिक दुसरे काही असू शकत नाही. आपल्या ग्राहकांशी संवाद साधताना, रोल्स रॉइसलाही तसेच वाटते हे जाणवले.

फॅब्रिक रूफ रचनेवर काम करत असताना रोल्स रॉइस अभियांत्रिकी टीमने स्वत:समोर एक आव्हानात्मक उद्दिष्ट ठेवले, ज्यात त्यांना कोणत्याही प्रकारची तडजोड आज जगातील सर्वाधिक शांत कन्व्हर्टिबल कार बनवत असताना करायची नव्हती. शांततेसाठीच्या या शोधात अभियांत्रिकीचे सर्व घटक एकत्र येऊन नवीन छत तयार केले गेले आणि नवीन मोटर कार तयार केली गेली.

सर्वप्रथम प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रूफ अप व रूफ डाऊनचा एक उत्तम अनुभव गाडी सुरू असताना मिळतो आणि तो खऱ्या अर्थाने रोल्स रॉइसचा असतो. छताचे डिझाइन सुंदर, देखणे आणि अद्भुत तर आहेच पण त्याचबरोबर एका कन्व्हर्टिबल कारसाठी सुंदर दिसणारे सर्वांत मोठ्या कनोपींपैकी एक ते ठरले होते.

प्रमुख नोंद घेण्याची एक गोष्ट म्हणजे कनोपी मागील सीटभोवती कशा रितीने गुंडाळली जाते आणि ती डॉनच्या खिडकीवरून खाली जाते आणि त्याद्वारे कारची रूफलाइन लहान करते. त्यामुळे गाडीच्या खालील बाजूला वळणाऱ्या दृश्यतेमध्ये भर घालते.

येथे नोंदवण्याची आणखी एक गोष्ट म्हणजे मागील बाजूच्या आरशांचा छोटा आकार- अत्यंत काळजीपूर्वकरित्या तयार केलेले प्रमाण ज्यामुळे रूफ टॉपसोबत गाडी चालवत असताना खासगी सँक्चरीची भावना येते.

यात दोन खास तंत्रांचा समावेश केला होता, ज्यामुळे छत केवळ सुंदर दिसत नाही तर ते आकर्षकही असते परंतु ते कार सुरु असताना त्याच्या शांततेत योगदान देते. अत्यंत सुंदर चांगला पृष्ठभाग ज्यात एक नावीन्यपूर्णरित्या तयार केलेले फ्रेंच सीम आहेत, त्यातून कारच्या वरून हवेचा प्रवाह रूफ अप होऊन त्यातून हवेचा आवाज लक्षात येण्यासारखा येत नाही. आतील बाजूस रोल्स रॉइस डॉन रोल्स रॉइस रेथइतकीच शांत आहे, जी कन्व्हर्टिबल मोटरिंगमधील पहिली आहे.

याशिवाय, रूफची रचना उघडणे आणि बंद होणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी सुंदर आणि कोणत्याही अडथळ्यांशिवाय असणे आवश्यक होते. अभियांत्रिकी टीम या विभागात आणखी पुढे गेली आणि त्यांनी रूफ मेकॅनिझमसोबत त्यांना जे प्राप्त करायचे होते त्यासाठी एक नावही दिले- दि सायलेंट बॅलेट

आणि सायलेंट बॅले ही गोष्ट त्यांनी प्राप्त केली.

अवघ्या २२ सेकंदांमध्ये पूर्णपणे शांततेत काम करताना आणि ताशी ५० किमी एवढ्या वेगाने जात असताना हे 'सायलेंट बॅलेट' एखाद्या भावनांमधील कमाल गोष्टी आणते, कारण शांतता व वगळणे या दोन्ही गोष्टी आवाज, प्रकाश आणि बाहेरच्या जगातील सुगंध यांच्या बदल्यात दिल्या व घेतल्या जातात. एखादा एअरलॉक उघडत असताना डॉन बाहेरील जगाकडे दरवाजा उघडते आणि त्याचे केबिन मालकाच्या सामाजिक जागेचा एक मोठा भाग बनते.

## बिस्पोक ऑडिओ

ज्यांना शांततेचा आवाज फारसा आवडत नाही आणि आपल्या मित्रांसोबत संगीत व मनोरंजन यांचा आनंद लुटायचा आहे त्यांच्यासाठी रोल्स रॉइसची बिस्पोक ऑडिओ सिस्टिम ही खास रोल्स रॉइस डॉनच्या रचनेसाठी योग्य ठरेल, अशी बनवण्यात आली आहे. रोल्स रॉइसच्या तज्ञ ऑडिओ इंजिनीअर्सनी सुंदररित्या तयार केलेला बिस्पोक ऑडिओ ही अत्यंत मेहनतीने डिझाइन केलेली ऑटोमोटिव्ह हायफाय सिस्टिम आहे, जी आतापर्यंत कधीही तयार केलेली नाही आणि डॉनच्या दुहेरी व्यक्तिमत्त्वाला अनुसरुन बारीक-सारीक तपशीलांवर लक्ष देऊन तिची रचना करण्यात आली आहे.

छत उघडे असो वा बंद, बिस्पोक ऑडिओ एक उत्तम आवाजाचा समतोल राखून चांगली कामगिरी देण्याची काळजी घेतो. ऑडिओ इंजिनीअर्ससोबत कारच्या संपूर्ण रचनेच्या प्रक्रियेदरम्यान चर्चा करण्यात आली होती आणि त्यांनी ऑडिओ सिस्टिमच्या कामगिरीसाठी काय प्रकारचे बदल करता येतील यावरही सखोल विचार केला होता. ही पद्धत ऑटोमोटिव्ह जगतात फारशी अस्तित्वात नाही.

सोळा वैयक्तिकरित्या डिझाइन केलेले स्पीकर्स ज्यात थिएटर आणि स्टुडिओ सेटिंग्सचाही समावेश आहे, त्यातून एक शुद्ध 'लार्जर दॅन लाइव्ह' संवेदना मिळते. दोन बास स्पीकर्स जे बूटमध्ये स्थित आहेत, ते सात ट्विटरसोबत पूरक ठरतात जे संपूर्ण केबिनमध्ये नीट बसवलेले आहेत. या सिस्टिममध्ये अत्यंत संवेदनक्षम मायक्रोफोनचा वापर करण्यात आला असून त्यातून बाह्य आवाजावर लक्ष ठेवले जाते आणि त्यानुसार गाडीतील आवाज व टोनचे सेटिंग बदलले जाते आणि सातत्यपूर्ण अचूकता आपल्याला मिळते. तंत्रज्ञान याला पूरक ठरत असताना वारंवारता व टप्पा यांच्यात वैयक्तिक स्पीकर्सनुसार सुधारणा केली जाते आणि बाहेरच्या आवाजामुळे मोठ्या आवाजाचे किंवा डेड स्पॉट्स टाळता येतात.

## ओपन अप मोटरिंगसाठी एक नवीन डॉनची निर्मिती

रोल्स रॉइस टीमने तयार केलेल्या सॉफ्ट टॉप कारच्या निर्मितीत घेतलेल्या वादातीत आघाडीबरोबरच नवीन रोल्स रॉइस डॉनमध्येही विविध टेलरमेड अभियांत्रिकी सुधारणांचा समावेश करण्यात आला आहे.

कोणत्याही कन्व्हर्टिबलच्या निर्मितीतील आव्हान संपूर्ण बॉडीमध्ये टॉर्सिनल टिकाऊपणा अत्यंत उच्च दर्जाचा राखतानाच त्याचे एकूण वजन कमी ठेवण्याचे असते. टॉर्सिनल टिकाऊपणा स्कटल शेक कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून तो अनेक कन्व्हर्टिबल कार्सशी जोडलेला असतो आणि ते कारच्या एकूण गतिमान रचनेला कायम राखण्यात मदत करतात.

अभियांत्रिकी टीमचे पूर्ण समाधान होईपर्यंत सखोल चाचण्या व संशोधन करण्यात आले होते. हजारो किलोमीटर ही गाडी अत्यंत कठीण व खाचखळग्यांच्या रस्त्यांवरून चालवण्यात आली आणि त्यातून संभाव्य अडचणी शोधून त्या दूर करण्यात आल्या. त्याचा परिणाम म्हणून त्याचे चॅसिस आहे, जे रोल्स रॉइस डॉनला आज उपलब्ध असलेले सर्वाधिक कठोर फोर सीटर कन्वर्टिबल बनवते.

Rolls-Royce Motor Cars

The Drive, Westhampnett, Chichester, West Sussex PO18 0SH
Telephone +44 (0)1243 384000
www.press.rolls-roycemotorcars.com

नव्याने डिझाइन केलेले सस्पेंशन कन्फिगरेशन या ओपन टॉप मोटर कारच्या विशिष्ट वागणुकीची काळजी त्याच्या बॉडीचा कडकपणा व मास वितरण यांच्याबाबत घेते आणि त्यातून सर्वोच्च दर्जाचा क्रुझिंग आरामदायीपणा व अपेक्षित रोल्स रॉइस 'मॅजिक कार्पेट' राइडची हमी घेतली जाते.

गुरुत्वाकर्षणाच्या पुढील व मागील केंद्रात असलेल्या थोड्या एअरोडायनॅमिक लिफ्ट्स, त्यासोबतच्या नव्याने डिझाइन केलेल्या एअर स्पिंग्स आणि कार्यरत रोल बार्समधून आकर्षकरित्या टिकाऊ हँडलिंग क्षमता या अत्यंत आलीशान सुंदर गाडीला मिळतात.

डॉनचा फ्लेअर केलेल्या सुंदर मागील बाजूमध्ये २४ मिमी रुंदीचा मागील ट्रॅक घोस्टच्या तुलनेत असून त्यामुळे डॉनला एक कमी उंचीचे, सडपातळ लूक्स मिळतात. याशिवाय, कारच्या रूंद मागील बाजूमुळे कारच्या सौंदर्यात तर भर पडतेच, पण त्याचबरोबर त्याचे मोठे शोल्डर्स तिला एक पुरूषीपणा व ताकद देतात जी गाडीला आवश्यक असते आणि त्याबरोबर १८० मिमी लहान व्हीलबेसही मिळतो.

**रोल्स रॉइस डॉन ड्रायव्हिंग अनुभवाचे केंद्रस्थान**

कोणत्याही रोल्स रॉइस मोटर कारचे धडधडते हृदय व आत्मा हा त्याचा अत्यंत सुंदर ट्विन टर्बो ६.६ लीटर व्ही१२ पॉवरट्रेन आहे. ५६३ बीएचपी किंवा ४२० किलोवॅटच्या पॉवर आऊटपुट ५,२५० आरपीएमवर मिळते आणि त्यासोबत टॉर्कचे रेटिंग ७८०एनएम किंवा ५७५ एलबी फूट @१५००आरपीएमवर असून डॉनचा ड्रायव्हिंगचा अनुभव त्यामुळे अत्यंत सुंदर होतो.

हा अनुभव एका डायनॅमिक ॲक्सिलरेटर पेडर मॅपिंगद्वारे वाढवला असून त्यातून मध्यम थ्रॉटलवरही सुमारे ३० टक्के वाढीव प्रतिसाद मिळू शकतो.

डॉनमधून रोल्स रॉइसची सर्वसाधारण स्टीअरिंग वैशिष्टे कायम ठेवली असून त्यातून उत्तम ड्रायव्हर अभिप्राय मिळतो आणि त्यामुळे कार अत्यंत आरामात पण तरीही चालवण्यास अचूक आहे याची खात्री घेतली जाते. त्याचवेळी खूप जास्त वेगातही मोठ्या प्रमाणावर सुरक्षितता दिली जाते, मग छत खुले असो वा बंद, त्याने फरक पडत नाही.

त्याचा परिणाम म्हणजे नवीन डॉन ही रोल्स रॉइसची आजपर्यंतची सर्वाधिक शक्तिशाली पूर्ण चार सीट ड्रॉपहेड मोटरकार असून त्याचे मुख्य कारण त्याचे अद्ययावत अभियांत्रिकी बाजारात उपलब्ध असलेल्या मोठ्या प्रमाणावरील २ अधिक २ कन्व्हर्टिबल्सच्या तुलनेत हलकी आणि जास्त इंधन कार्यक्षम आहे.

या गाडीला रनफ्लॅट टायर्सनी ग्रिप दिलेली असून त्यांचा आकार ५४० मिमी (२०) त्रिज्या इतका आहे. हे टायर डॉनला एका डिफ्लेटेड टायरवर किमान १०० मैल/१६० किमी आणि सुमारे ५० एमपीएच/८० किमी/तास चाक बदलण्यापूर्वी चालवण्याची संधी देतात. यात मोठ्या प्रमाणावर नियंत्रण अद्यापही मिळते, मग टायर पूर्णपणे सपाट झाले असले तरी ते राहते. यात पर्यायी २१ इंच चाकेही उपलब्ध आहेत, ते १० आऱ्यांच्या रिम्सवर बसवलेले आहेत. रनफ्लॅट टायर तंत्रज्ञानाचा समावेश केल्यामुळे अतिरिक्त चाके आणि जॅकची आवश्यकता निघून गेली असून सामानाच्या विभागातील जागा त्यामुळे मोकळी झाली आहे.

## सहजसोप्या ड्राइव्हसाठी एक उत्तम तंत्रज्ञान

उत्तम मोटर कार्सच्या संपूर्ण रोल्स रॉइस कुटुंबाला अनुसरुन नवीन डॉन ऑटोमोटिव्ह डिझाइन आणि तंत्रज्ञान यांच्या केंद्रस्थानी राहिली आहे. डॉनमधून चालकांना खास तंत्रज्ञानाची एक श्रेणी दिली जाते, ज्यातून त्यांचा कारमधील आरामाचा वेळ हा अत्यंत ऐषारामी व सहजसोप्या ड्रायव्हिंगच्या अनुभवाचा असेल. या कारच्या तंत्रज्ञानात्मक कार्यांमधील खास रचना हे त्याचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे डॉनमध्ये स्पिरिट ऑफ एक्स्टसी रोटरी कंट्रोलर असून हे एक खास वन टच सोल्यूशन आहे, जे वापरकर्त्याला मीडिया आणि नेव्हिगेशन वैशिष्टे सहजसाध्य होतात.

उदा. नेव्हिगेशन इनपुट किंवा मीडिया यांच्यासाठीचा शोध त्याच्या पृष्ठभागावर बोटांनी करता येऊ शकेल, जो स्मार्टफोनच्या रचनेप्रमाणेच आहे. एक वन-टच कॉल बटण जे स्टीअरिंग व्हीलवर सहजपणे लावलेले आहे, त्यामुळे वापरकर्त्याला अत्यंत साध्या आवाजाच्या सूचना देऊन कारचे कार्य बदलता येऊ शकेल. या दोन्ही वैशिष्टयांमुळे खूप जास्त बटणांची गरज निघून जाते आणि वापरण्यास ते अत्यंत होते. उदा. फक्त एक बटण दाबा आणि म्हणा, ''सेंट ट्रोपेझकडे नेव्हिगेट'' करा. मग कारची नेव्हिगेशन सॅटेलाइट यंत्रणा सर्वाधिक वेगवान मार्ग तुम्हाला दाखवत राहील.

या स्पिरिट ऑफ एक्स्टसी रोटरी कंट्रोलरमध्ये एका टच पॅडचा समावेश आहे. (टचस्क्रीन ऐवजी, ज्या ड्रायव्हर आणि प्रवाशांच्या नजरेच्या पातळीत नको असलेल्या बोटांच्या खुणा ठेवू शकतात), त्यात बोटांनी अक्षरे लिहिण्याची सोय तसेच क्रोम डायल फिरवून त्याची कार्ये निवडण्यासाठी दाबून स्क्रोल करण्याची क्षमताही आहे.

ही सिस्टिम लॅटिन व अरेबिक अक्षरे ओळखते आणि मँडरीनही ओळखते.

रोटरी कंट्रोलरच्या टच पॅडमुळे 'पुल आणि पिंच' वैशिष्टेही आहेत. त्यामुळे स्मार्ट फोनच्या कार्याप्रमाणे त्याचे कार्य चालते. त्यामुळे वापरकर्त्याला स्क्रीनवरील निवडलेले भाग पिनपॉइंट करता येतात किंवा त्यांना मोठे करता येतात.

अत्यंत उत्तमरित्या अपडेट केलेल्या मल्टीमीडिया इंटरफेस आणि नेव्हिगेशन सिस्टिममधील माहिती अत्यंत सुंदररित्या एका नवीन १०.२५ इंची हाय डेफिनेशन स्क्रीनवर लावलेली असते आणि त्याचवेळी हार्डवेअर व सॉफ्टवेअर बदलांमुळे वेगवान मार्गांच्या मोजणीसाठी प्रोसेसिंगचा वेग वाढवण्यात आला आहे.

एका ऑटोमॅटिक क्रूझ कंट्रोल सिस्टिममुळे वेग आणि अंतरातील सातत्याने छोट्या-छोट्या अचूक तडजोडी करता येतात आणि त्यामुळे गाडी सातत्याने ब्रेक दाबणे, थांबणे व सुरु करणे कमी करता येते. चालक आता शहरातील वाहतुकीच्या गर्दीत आत्मविश्वासाने व आश्वस्त होऊन गाडी चालवू शकतो आणि त्याचे कारण परिस्थितीचा अभ्यास करणारी यंत्रणा आणि बदलत्या वाहतुकीच्या पद्धतीनुसार चालणारी यंत्रणा आहे. उदा. नवीन रस्त्यावर जाताना किंवा निसरडे रस्ते असतात तेव्हा.

Rolls-Royce Motor Cars
The Drive, Westhampnett, Chichester, West Sussex PO18 0SH
Telephone +44 (0)1243 384000
www.press.rolls-roycemotorcars.com

रडार आणि कॅमेरा यांच्यासाठी नवीन सॉफ्टवेअर पुढील बंपर व्हॅलन्समध्ये व सेंटर अप्पर विंडस्क्रीनवर अनुक्रमे बसवण्यात आले आहे आणि त्यातून वेगवान यंत्रणा प्रतिसाद वेळ मिळतो, त्यात आपत्कालीन ताण आधीच समजून घेण्यासाठी ब्रेक्सचे वेगवान प्री कंडिशनिंग केले जाते.

नको असलेली परिस्थिती उद्भवल्यास, डॉनमधून एक बांधलेले रोल ओव्हर संरक्षण सिस्टिम चालू केली जाईल, जी मागील बाजूच्या डोक्याकडून अवघ्या सेकंदात बाहेर येईल. त्यानंतर एक रॅटचॅट सिस्टिम त्यांना एकत्र बांधेल. या रोल ओव्हर संरक्षण यंत्रणेत कारचा संपूर्ण विंडस्क्रीन सराऊंडचाही समावेश आहे.

**सॅटेलाइटच्या मदतीने ट्रान्समिशन**

रोल्स रॉइस डॉनच्या सहजसाध्य रचनेत सॅटेलाइटच्या मदतीने ट्रान्समिशनचाही समावेश असून हे असे तंत्रज्ञान आहे ज्याचे उद्घाटन जागतिक पातळीवर रेथवर २०१३ मध्ये केले होते.

सॅटेलाइट एडेड ट्रान्समिशनमध्ये जीपीएस माहितीचा वापर करून कारला चालक जे पाहतो त्याच्या पलीकडे पाहण्यासाठी मदत केली जाते आणि स्थान व ड्रायव्हिंगची शैली यांच्यावर आधारित पुढील पावलाचा अंदाज घेतला जातो.

डॉनच्या ८ स्पीड झेडएफ गिअरबॉक्समधून सर्वाधिक योग्य गिअरचा वापर करण्यासाठी या माहितीचा वापर केला जातो आणि त्यातून चालकाला रोल्स रॉइस ६.६ लीटर ट्विन टर्बो व्ही१२ च्या ताकदीचा योग्य वापर करता येईल आणि कोणत्याही त्रास तसेच अडथळ्याविना गाडी चालवण्याचा अनुभव घेता येईल, याची काळजी घेतली जाते.

उदा. एखाद्या तीव्र वळणाकडे गाडी जात असताना तुम्हाला तिथे कसे ड्रायव्हिंग करायचे आहे याचा अंदाज ही कार घेईल. ड्रायव्हर ॲक्सिलरेटर वच उचलेल तेव्हा ती खालील गिअर धरून ठेवेल आणि त्यातून एखाद्या वळणातून बाहेर पडत असताना ॲक्सिलरेट होत असताना सर्वाधिक ताकद उपलब्ध होईल याची काळजी घेतली जाईल.

सॅटेलाइट एडेड ट्रान्समिशन डॉनमध्ये एक प्रमाण म्हणून उपलब्ध होते.

**रात्रीपासून पहाटेपर्यंत- उत्तम तंत्रज्ञान मार्ग दाखवते**

एलईडी लायटिंग तंत्रज्ञानातील अद्ययावत नवीन सुधारणांचा वापरही रोल्स रॉइस डॉनमध्ये करण्यात आला आहे. या लाइट्सचे व्यवस्थापन ज्या पद्धतीने करण्यात आले आहे, ते ॲडाप्टिव्ह तंत्रज्ञानाने विस्तारित करण्यात आले आहे. कार मागील दिशेने पार्किंग करताना व्हिजनची एक उत्तम सखोलता प्रदान करण्याकरिता इलेक्ट्रॉनिकरित्या नियंत्रित केलेले रिफ्लेक्टर्स, चाके ज्या पद्धतीने फिरतात त्या पद्धतीने प्रवासाच्या दिशेने फिरतात आणि एक शुभ्र, तेजस्वी लाइट ड्रायव्हरच्या थकव्याला कमी करण्यास मदत करण्यासह अंधकारमय रस्त्यावर प्रभावी व सुरक्षित प्रवासाची खात्री प्रदान करते.

Rolls-Royce Motor Cars

The Drive, Westhampnett, Chichester, West Sussex PO18 0SH
Telephone +44 (0)1243 384000
www.press.rolls-roycemotorcars.com

याशिवाय, फुल बीम हेडलाइट्सचे ऑटोमॅटिक डिपिंगमध्ये क्रांतीकारक नवीन ग्लेअर मुक्त तंत्रज्ञानाने बदल करण्यात आले आहेत. एखादी कार समोरून येत असताना प्रकाश खाली जातो आणि त्यामुळे समोरच्या चालकाला त्याचा त्रास होणार नाही याची काळजी घेतली जाते. डॉनचे चालक त्यामुळेच सातत्याने फुल बीम दृश्यतेच्या सुरक्षिततेच्या फायद्यांचा आनंद घेतात. डे टाइम रनिंग बार फ्रेम्समध्ये डॉनच्या समकालीन फ्रंट लाइट ग्राफिक्सचा समावेश असून त्यामुळे या कारला एक खास रूप मिळते आणि त्याचवेळी सुरक्षिततेचीही पूर्ण काळजी घेतली जाते.

रात्रीच्या वेळची ड्रायव्हिंगची सुरक्षितता हेड अप डिस्प्ले व हीट डिटेक्शन सिस्टिमने मिळते ज्यातून मानवी आणि प्राण्यांच्या शरीरातील उष्णतेचा अंदाज घेतला जातो आणि चालकाला संभाव्य धोक्याची सूचना योग्य रितीने दिली जाते.

## तांत्रिक वैशिष्ट्ये

| | |
|---|---|
| **आकारमान** | |
| वाहन लांबी | ५,२८५ मिमी/१७.३४ फूट |
| वाहन रुंदी | १,९४७ मिमी/६.३९ फूट |
| वाहन उंची (अनलॅडेन) | १,५०२ मिमी/४.९३ फूट |
| व्हीलबेस | ३,११२ मिमी/१०.२१ फूट |
| टर्निंग सर्कल | १२.७ मी/४१.७ फूट |
| बूट व्हॉल्युम (डीआयएन) | २४४ ली - २९५ ली/८.६ फूट३ - १०.४ फूट३ |
| | |
| **वजन** | |
| अनलॅडेन वजन (डीआयएन) | २,५६० किग्रॅ/५,६४४ एलबी |
| | |
| **इंजिन** | |
| इंजिन/सिलेंडर्स/व्हॉल्व्हस् | व्ही/ १२/ ४८ |
| इंधन व्यवस्थापन | डायरेक्ट इंजेक्शन |
| पॉवर आऊटपुट इंजिन गती | ५६३ बीएचपी/ ४२० किलोवॅट/५७० पीएस @ ५,२५० आरपीएम |
| अधिकतम टॉर्क इंजिन गती | ७८० एनएम/ ५७५ एलबी फूट @ १,५०० आरपीएम |
| इंधन प्रकार | १०:१/ प्रिमिअम अनलीडेड |
| | |
| **परफॉर्मन्स** | |
| उच्च गती | २५० किमी प्रति तास / १५५ माइल प्रति तास (संचालित) |
| त्वरण ० ते १०० किमी/तास | ४.९ सेकंद |
| | |
| **इंधन वापर** | |
| शहर | २१.४ ली/ १०० किमी /१३.२ एमपीजी (एलएमपी) |

| | |
|---|---|
| शहर अतिरिक्त | ९.८ ली/ १०० किमी / २८.८ एमपीजी (एलएमपी) |
| संयोजित वापर / रेंज | १४.२ ली/ १०० किमी / १९.९ एमपीजी (एलएमपी) |
| कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन | ३३० ग्रॅम/किमी |

वरील आकडेवारी अंतिम पडताळणीला अनुसरुन आहे.

- समाप्त -

## अधिक माहिती

तुम्ही आमच्या सर्व प्रेस रिलीज आणि प्रेस किट्स तसेच हाय रेझोल्यूशन, डाऊनलोड करण्यायोग्य छायाचित्रे आणि व्हिडिओ फूटेज आमच्या PressClub मीडिया वेबसाइटवरून डाऊनलोड करू शकता. तुम्हाला रोल्स रॉइस मोटर कार्सच्या संवाद टीमशी संपर्क ट्विटरवर साधता येईल.

## प्रसारमाध्यम संपर्क:


### गुडवूड

- **ग्लोबल कम्युनिकेशन्स संचालक**
  रिचर्ड कार्टर +44 (0) 1243 384060 richard.carter@rolls-roycemotorcars.com
- **ग्लोबल कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स**
  अँड्रयू बॉल +44 (0) 1243 384064 andrew.ball@rolls-roycemotorcars.com
- **ग्लोबल प्रॉडक्ट कम्युनिकेशन्स**
- अँड्रयू बॉयेल +44 (0) 1243 384062 andrew.boyle@rolls-roycemotorcars.com
- **ग्लोबल लाइफस्टाइल कम्युनिकेशन्स**
- एम्मा रिकेट +44 (0) 1243 384061 emma.rickett@rolls-roycemotorcars.com

### प्रादेशिक

- **एशिया पॅसिफिक-उत्तर**
  रोझमेरी मिशेल +81 (0) 3 6259 8888 rosemary.mitchell@rolls-roycemotorcars.com
- **एशिया पॅसिफिक-दक्षिण**
  रानी रामय्या +65 6838 9753 rani.ramaya@rolls-roycemotorcars.com
  हाल सेरूदीन +65 6838 9675 hal.serudin@rolls-roycemotorcars.com
- **चीन**
  ॲना हू + 86 1084558037 anna.xu@rolls-roycemotorcars.com
- **युरोप- पूर्व**
  फ्रँक टिएमन +49 (0) 89 382 29581 frank.tiemann@rolls-roycemotorcars.com

- **युरोप- पश्चिम**

  रूथ हकलेब्रोइक +49 (0) 89 382 60064 ruth.hucklenbroich@rolls-roycemotorcars.com
- **मध्यपूर्व, आफ्रिका व लॅटिन अमेरिका**

  जमाल अल मावेद +971 561717883 jamal.almawed@rolls-roycemotorcars.com
- **उत्तर अमेरिका**

  जेरी स्पाहन +1 201 930 8308 gerry.spahn@rolls-roycemotorcarsna.com
- **ब्रिटन आणि स्कँडिनेव्हिया**

  जेम्स वॉरेन +44 (0)1243 384578 james.i.warren@rolls-roycemotorcars.com